# पौलाने केला तसा छळाचा सामना करा

मुलांना शिकवणाऱ्यांनी P3b हा अभ्यास वाचावा.



''मनुष्यस्वभावाप्रमाणे म्हणावयाचे तर इफिसात श्वापदांबरोबर लढाई केली ह्यांत मला काय लाभ? मेलेले उठविले जात नाहीत तर चला, आपण खाऊ पिऊ कारण उद्या मरावयाचे आहे.'' 1 करिंथ 15:32

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, अन्याय्य छळाचा सामना करण्यासाठी तू पौलाला सामर्थ्य, सूज्ञता, सहनशीलता व कृपा हे सर्व पुरवले तसेच आम्हांलाही पुरवून दे.''

**1. छळाचा सामना करण्यासाठी देवाच्या वचनाच्याद्वारे तुमच्या अंतः करणाची तयारी करा.**

टीप. आपल्या जीवनात प्रत्येकालाच अप्रिय गोष्टींना तोंड घावे लागते– दु:ख सहन करावे लागते. दु:ख अनेक प्रकारचे असते: कारण नसताना आम्हांला दु:ख सोसावे लागते; आमच्या हातून घडलेल्या चुकीमुळे आम्हांला शिक्षा भोगावी लागते; सैतानाकडून होणाऱ्या जुलूमाला आम्ही बळी पडतो; आणि आमच्या धर्माचा द्वेष करणाऱ्यांकडून होणारा छळ आम्हांला सोसावा लागतो.

सुज्ञ समंजस अशा सर्व राष्ट्रांमध्ये धार्मिक छळ हा बेकायदेशीर आहे. तरीही धार्मिक छळ होतोच. अन्याय्यकारक पद्धतीने आमचा छळ होतो तेव्हा आम्ही देवाला हाक मारून आमचा छळ करणाऱ्यांना आशीर्वाद देण्याची आणि आम्ही येशूशी विश्वासू राहावे यासाठी आम्हांला कृपा पुरवण्याची विनंती केली पाहिजे. कायद्याचे ज्ञान असणाऱ्या विश्वासणाऱ्यांनी सर्व धर्मांच्या लोकांचा छळ होऊ नये यासाठी शांततामय मार्गांने सामाजिक कृती केली पाहिजे.

**मार्क 8:27-38** वाचून येशू व त्याचे दु:ख सहन याविषयीची महत्वाची सत्ये शिका.

- येशू खरोखर कोण होता ते पाहा. *(पाहा वचने 27-30)*
- येशू पृथ्वीवर का आला ते पाहा. *(वचन 31-33)*
- येशूची त्याच्या शिष्यांनी काय करावे अशी इच्छा आहे *(वचने 34-38)*

**प्रे. कृ. 8:3** मध्ये शौल त्याची ख्रिस्ताशी भेट होण्यापूर्वी विश्वासणाऱ्यांशी कसा वागला ते पाहा.

**प्रे. कृ. 9:1-31** मध्ये शौल आधी विश्वासणाऱ्यांना शोधून शोधून त्यांचा
छळ करीत असे ते सोडून तो त्यांचीच सेवा करू लागला हा बदल देवाने त्याच्यात कसा घडवला ते पाहा.

- येशू जिवंत असून त्याच्याच नियंत्रणात सर्व आहे हे प्रथम शौलाला कधी कळले? *(वचने 1-8)*
- शौलाच्या बाबतीत देवाचा हेतू काय होता? *(वचन 15)*
- शौलाच्या बाबतीत काय घडेल असे देवाने सांगितले? *(वचन 16)*
- शौलाने प्रथम येशूला कसा प्रतिसाद दिला? *(वचने 17-19)*
- शौलाने कोठे शिक्षण दिले आणि पहिल्या दोन ठिकाणी त्याला कोणत्या गोष्टीला तोंड द्यावे लागले? *(प्रे. कृ. 7:20-30)*

प्रे. कृ. 13:49-14:23 मध्ये मिशनरी सेवा करताना शौलाने (आता पौल) कशा प्रकारे दु:ख सोसले ते पाहा.

- येशूने सांगितले की लोक आम्हांला नाकारतील तेव्हा निघताना आपल्या पायांची धूळ झटकून टाका (मत्तय 10:14) पौल व बर्णबाला अत्युंखिया सोडताना असे कोणत्या लोकांच्या विरूद्ध करावे लागले? *(प्रे. कृ. 13:50-51)*

- देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी शिष्यांनी काय करणे अगत्याचे आहे? *(प्रे कृ. 14:22)*
- प्रोषित इकुन्यातून पळून का गेले? *(प्रे. कृ. 14:1-6)*
- पौलाला दगडमार करणाऱ्या लोकांनी त्याला लुस्म नगराच्याबाहेर टाकून का दिले? *(प्रे. कृ. 14:7-20)*

**2 करिंथ 11:23-33** मध्ये पौलाने किती विविध प्रकारच्या संकटांचा सामना केला ते पाहा.

**2 तीमथ्य 3:10-12** मध्ये कोणाचा छळ होणे अपेक्षित आहे ते पाहा.

**प्रे. कृ. 16:16-34** मध्ये फिलिप्पै येथील लोक पौल व सीलाशी वाईट का वागले, ते पाहा.

**प्रे. कृ. 17:12** मध्ये छळ होत असतानाही साधारणापणे काय घडत होते ते पाहा.

**1 थेस्सल 1:6-7** मध्ये थेस्सलनीकावासीय कशा प्रकारे पौल व येशूचे अनुकरण करीत होते ते पाहा.

**1 थस्सल 2:14-16** म्ध्ये त्यांनी कोणत्या प्रकारे यहूदीयातील मंडळ्यांचे ही अनुकरण केले ते पाहा.

**1 थेस्सल 3:2-4** मध्ये नवीन विश्वासणाऱ्यांना आम्हीं छळामुळे होणाऱ्या दु:खा विषयी काय सांगितले ?

**रोम 8:16-17** ख्रिस्ताच्या दु:खात सहभागी असलो तर त्याच्या बरोबर कशात वाटेकरी होऊ ते पाहा.

**रोम 8:28** जेव्हा लोक आम्हाशी दुर्व्यवहार करतात तरीही आमच्या अंत:करणात शांती का असते,

**रोम 8:33-39** मध्ये येशूच्या प्रीतीमुळे कोणत्या गोष्टींवर आम्हांला विजय मिळेल ते पाहा.

**मत्तय 5:10-12** मध्ये छळामध्ये आम्ही टिकून राहिलो तर आम्हांला कोणते प्रतिफळ मिळणार आहे ते पाहा.

**योहान 15:18-19** मध्ये ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांचा जग द्वेष का करते ते पाहा.

2. **सहकाऱ्यांशी चर्चा करून आठवडा भरातील कार्यक्रम ठरवा.**

- छळ होणार हे अपेक्षित धरून त्याला सूज्ञपणे प्रतिसाद देण्यासाठी देवाने सामर्थ्य शक्ती द्यावी यासाठी एकत्रित प्रार्थना करा.
- छळाला बळी पडलेल्यांची भेट घेऊन प्रार्थना करा आणि त्यांना देवाच्या अभिवचनांची खात्री द्या.
- छळ होईल ह्या भीतीने तुमची मंडळी महत्वाच्या कार्याकडे दुर्लक्ष करीत असेल तर मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रार्थना करा. पौलाचा छळ कशामुळे झाला यावर विचार करा (येशूच्या मागे जाणे, त्याचे वचन शिकवणे,आरोग्य देणे भुते काढणे सात्विकपणे वागणे इत्यादी.)
- छळा विषयीच्या बातम्या आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांमध्ये छापून देणाऱ्या प्रसारमाध्यमांशी संपर्क साधा,
- छळाचा सामना करण्यासाठीच्या तुमच्या योजनांवर एकमताने सहमती दाखवा.

3. **सहकाऱ्यांशी चर्चा करून पुढील उपासनेचे कार्यक्रम ठरवा.**

तुमच्या मंडळीच्या सध्याच्या गरजा व स्थानिक परिस्थिती ह्यांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

मार्क 8:34-38 मधुन येशूचे दु:ख सहन याविषयीचे सत्य स्पष्ट करून सांगा.

पौलाच्या दु:ख सहनाविषयीचे सत्य स्पष्ट करून सांगा. पौला ज्या प्रकारच्या छळाला तोंड देऊन त्यात टिकून राहिला त्याबद्दलचे काही वृत्तांत वाचा आठवून सांगा किंवा नाटयीकरण करा.

आमच्या संकटे सोसण्याविषयीच्या सत्याचे स्पष्टीकरण करा.

- वर दिलेली वचने वाचून त्यातून उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांवर चर्चा करा.
- केव्हा केव्हा आमचा छळ करणाऱ्यांचे तारण बचाव करून (प्रे. कृ. 9:1-31) किंवा सरकारी अधिकाऱ्यांसाठीच्या आमच्या प्रार्थनांना प्रतिसाद देऊन (1 तीमथ्य 2:1-2) प्रभु आपल्या लोकांना वेळोवेळी कृपेने शांतीचा समय कशा प्रकारे बहाल करतो याचे स्पष्टीकरण करा.

मुलांनी तयार केलेली नाटिका व प्रश्न मोठया माणसांसमोर सादर करण्याची त्यांना संधी द्या.

विश्वासणाऱ्यांनी नुकताच छळाला कशा प्रकारे प्रतिसाद दिला हे त्यांना साक्ष देऊन सांगण्यास सांगा.

प्रभु भोजनाची ओळख करून देण्यासाठी मार्क 10:32–44 ह्या शास्त्रभागातुन येशूने तो जो मरणाचा 'प्याला' पिणार असल्याचे सांगितले त्याविषयी वाचा किंवा लक्षात ठेवून सांगा आध्यात्मिक दृष्टया आम्ही ख्रिस्ताशी त्याचे मरण व पुनरूत्थान याद्वारे जोडले जातो आम्ही स्वत: पापाला मेलो आहोत असा विचार करण्यास प्रभुभोजनाने आमचे साहाय्य होते.

दोन वा तीन जणांचे लहान गट तयार करा. प्रार्थना करा. छळाचा सामना करण्यासाठीच्या योजनांना मंजुरी द्या आणि एकमेकांना प्रोत्साहन द्या.

**पाठ करा** 2 तीमथ्य 3:12

Copyright © 2004 by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net